# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : २१/०२/२०२४

# प्रेसनोट

मा.श्री.बालाजी किणीकर, आमदार, अंबरनाथ यांनी आज दिनांक २१/०२/२०२४ रोजी एम.एम.आर.डी.ए. मार्फत बनविण्यात येणा-या उल्हासनगर शहरातील मुख्य ७ रस्त्यांचे बांधकामाबाबत श्री. अजीज शेख, महापालिका प्रशासक तथा आयुक्त यांची भेट घऊन लोकसभा निवडणूक लवकरच जाहीर होणार असल्याने सदर रस्त्यांची कामे १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

त्याअन्वये महापालिका आयुक्त मा.श्री.अजीज शेख यांनी सर्व संबंधित विभाग प्रमुख, कार्यकारी अभियंता, प्रभाग अधिकारी, ठेकेदार व सल्लागार यांची तातडीची बैठक घेऊन सदरच्या ७ रस्त्यांचे कामाचा आढावा घेतला असता, रस्त्यांच्या कामामध्ये येणा-या अडचणी व त्यांवरील उपाययोजना यांचेबाबत सविस्तर चर्चा करण्यात करण्यात आली.

रस्त्यांचे कामात बाधा येणारी अनधिकृत बांधकामे नियमानुसार त्वरीत हटविण्यात योवीत, बांधकाम निष्कासीत करतांना धुळीचे प्रदुषण होणा नाही म्हणून हिरवा कपडा लावण्यात यावा, तसेच रस्त्यामध्ये येणारे विद्युत पोल, ट्रांसफार्मर योग्य त्या ठिकाणी स्थानांतरीत करण्यात यावेत, ड्रेनेज व जलवाहिनींची कामे वेळेत पूर्ण करण्यात यावीत, रस्त्यावर खोदकाम करतांना निर्माण होणारे मातीचे ढिगारे त्वरीत हटविण्यात यावेत, मातीमुळे रस्त्यावर रहदारी करतांना धुळ ऊडून प्रदूषण होणार नाही याकरिता आवश्यक उपाययोजना करण्यात यावेत, रत्यांवरील जीओचे चर व महानगर गॅस पाईपलाईनचे चराच्या कामाबाबत देखील योग्य ती कार्यवाही त्वरीत करण्यात यावी, रस्यांमध्ये येणारी मोठी झाडे तोडू नयेत तर ती योग्य रीतीने इतर ठिकाणी पुन्हा ट्रांसप्लांट करण्यात यावीत, रस्त्यांची कामे करतांना सर्व विभाग प्रमुख, ठेकेदार व सल्लागार यांनी एकमेकांच्या समन्वयाने कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे, तसेच या कामी कोणत्याही प्रकारे प्रदुषण होणार नाही याची देखील दखल घेण्याच्या सूचना मा.आयुक्तांनी ठेकेदार व संबंधीत विभाग प्रमुख यांना दिल्या. तसेच श्री.माधव जवादे, सल्लागार, पाणी पुरवठा विभाग यांनी पाणी पुरवठा विभागामार्फत ज्या योजना चालु आहेत त्या पूर्ण करणेसाठी त्वरित कार्यवाही करण्यात यावी. असे निर्देश देण्यात आले.

सदर बैठकीस मा.श्री.जमीर लेंगरेकर (अतिरिक्त आयुक्त, शहर), मा.श्री.अशोक नाईकवाडे (उप-आयुक्त) मुख्यालय, श्री.सुभाष जाधव, (उप-आयुक्त), पार्यवरण विभाग, श्री.ललित खाब्रागडे, सहा.संचालक, नगररचना विभाग, श्री. संदीप जाधव, प्र. शहर अभियंता, श्री. परमेश्वर बुडगे, प्र. कार्यकारी अभियंता, पाणी पूरवठा विभाग, श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, श्री. विलास नागदिवे, सहायक आयुक्त, मालमत्ता विभाग, श्री. अमोल पाटील, उपअभियंता, एम.एम.आर.डी.ए., श्री. तरुण सेवकानी, उप अभियंता, श्री. गणेश शिंपी, नोडल अधिकारी (अ.बां.नि.वि.) तथा सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्रं.४, श्री. अनिल खतुरानी, सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१, श्री. मनिष हिवरे, सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र.२, श्री. दत्तात्रय जाधव, सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र.३, श्री. संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, श्री. हर्षद प्रधान, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.माधव जवादे, सल्लागार, पाणी पुरवठा विभाग, श्री. प्रविण पाटील, कंत्राटदार, एम.एम.आर.डी.ए. व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(छाया प्रकाश डीगोळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.